# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १६.०४.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १५.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये एकूण ०३ इसमांवर कारवाई करून एकुण ३,७००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,५५२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९०,०५०/—रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे अजनी— जिवे ठार मारणारे आरोपींविरुध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.१०.२०२६ चे २२.३० वा. ते २३.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी हर्षल उर्फ ॲलेक्स संजय शिंदे वय २५ वर्ष रा. रानी भोसले नगर, भांडेप्लॉट, सक्करदरा, नागपूर हा त्याचा मित्र नामे सागर गिरीधर सलामे वय २२ वर्ष रा. सोलंकी वाडी, सेवादल नगर, शिवमंदीरजवळ, सक्करदरा, नागपूर याचेसोबत पल्सर मोटारसायकलने अजनी हद्दीत सिध्देश्वर हॉलकडे जात असता, सागर यास कोणाचा तरी फोन आला व त्याने सागर यास पोलीस ठाणे अजनी हद्दीत जादूमहल चौक येथे बोलाविले. वरुन दोघेही तिथे गेले असता, दोन मोपेडवरुन आलेल्या पाच मुलांनी व त्यांचे इतर साथीदार यांनी फिर्यादी व त्याचा मित्र सागर यांचा घेराव करुन त्यातील एकाने सागर यास ''उस दिन तुने दंडा मारा था ना'', असे म्हणून जूने भांडणाचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाकडी दंडा व राफटर ने तसेच चाकूने दोघांनाही मारुन जखमी केले. सागर तेथून पळाला असता, आरोपींनी त्याचा पाठलाग करुन नंदीनी मेडीकल स्टोअर्स समोर त्याचे छातीवर व इतर ठिकाणी चाकू व इतर धारदार शस्त्राने वार करुन जिवानिशी ठार केले. फिर्यादीसुध्दा जखमी अवस्थेत तेथून गाडी घेऊन सक्करदरा तलाव जवळ जाऊन बेशुध्द झाला. जखमी याला त्याचे मित्राने उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. त्याचेवर उपचार संरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. मनिषा झांझुर्णे ९९७५३८०५७७ यांनी आरोपींविरूध्द कलम १०३(१),१०९,१८९(२),१९१(२),१९१(३),१९०,६१(२) भा.न्या.सं. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १४.०४.२०२६ चे ११.३० वा. ते १५.४० वा. चे दरम्यान, फिर्यादी विनोद उत्तमराव कडू वय ६१ वर्ष रा. ३९, पंचतारा हाऊसिंग सोसायटी, मनिषनगर, बेलतरोडी हे त्यांचे वैद्यकीय तपासणीकरीता पोलीस

ठाणे सिताबर्डी हद्दीत, आरटीओ ऑफीसचे विरुध्द बाजुस गिरीपेठ येथील पल्स इमेजींग अॅन्ड डायग्नोस्टिक सेंटर येथे एमआरआय काढण्याकरीता गेले होते. त्यांना त्यांचे जवळील धातुच्या वस्तु काढून ठेवण्यास सांगितले असता त्यांनी त्यांचेजवळील साहित्य व सोन्याचा गोफ वजनी ३० ग्राम कि. २,७०,०००/— चा काढून बाहेर खुर्चीवर ठेवला होता. तपासणी झालेवर बाहेर बसून असतांना त्यांनी बाहेर ठेवलेल्या सोन्याचे गोफची पाहणी केली असता, ठेवलेल्या ठिकाणी गोफ दिसून आला नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचा गोफ चोरुन नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. वंजारी ७०२८३६९३८१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आह

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे नंदनवन :—** सौ. दिपाली अश्विन पिल्लेवार वय ३० वर्षे, रा. हरपूरनगर, उमरेड रोड, नंदनवन, नागपूर हया दिनांक १३.०४.२०२६ रोजीपासून सोबत मुलगी नामे आर्विका अश्विन पिल्लेवान वय अडीच वर्ष हिचेसह पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतून राहते घरी कोणाला काही न सांगता निघून गेल्या, घरी परत आलेल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाहीत. **वर्णन** रंग— निमगोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडतपाळ, उंची ५ फुट ५ इंच, केस— काळे. भाषा—मराठी व हिंदी बोलतात. कपाळावर जुने माराचे निशान आहे.



सौ. दिपाली



आर्विका

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**